
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

Tribal Studies Center (आदिवासी अध्यासन केंद्र)



आदिवासी संस्कृती, इतिहास व पारंपारिक ज्ञान दस्तऐवजीकरण संशोधन फेलोशिप

लघु संशोधन प्रकल्प (MRP) 2026-27
टप्पा – II

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथील आदिवासी अध्यासन हे आदिवासी समाजाशी संबंधित विविध उदयोन्मुख विषय, आदिवासी जीवन, इतिहास व संस्कृती यांवर संशोधनास प्रोत्साहन देण्यासाठी कार्यरत आहे. आदिवासी समाजाचे जीवन, इतिहास व संस्कृती यांचे जतन व दस्तऐवजीकरण करण्याच्या उद्देशाने केंद्रामार्फत "आदिवासी संस्कृती, इतिहास व पारंपारिक ज्ञान दस्तऐवजीकरणासाठी संशोधन फेलोशिप - लघु संशोधन प्रकल्प (MRP) २०२६-२७" या उपक्रमाचा टप्पा-II सुरू करण्यात येत आहे.

आदिवासी अध्यासन केंद्रामार्फत आदिवासी जीवन, संस्कृती, इतिहास व जीवनपद्धतीशी संबंधित विविध क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण संशोधन प्रस्ताव सादर करण्यासाठी संशोधकांना आवाहन करण्यात येत आहे. आदिवासी अध्ययनाच्या क्षेत्रात सैद्धांतिक, संकल्पनात्मक, शास्त्रीय व धोरणात्मक योगदान देणाऱ्या संशोधन प्रकल्पांना संशोधन अनुदान, आर्थिक सहाय्य व मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या माध्यमातून आदिवासी समाजाविषयीच्या ज्ञानाचे दस्तऐवजीकरण, संकलन, जतन, संवर्धन व प्रसार करणे, आदिवासी सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करणे तसेच नाविन्यपूर्ण व आंतरशाखीय संशोधनास प्रोत्साहन देणे, हे केंद्राचे उद्दिष्ट आहे.

संशोधन फेलोशिप विषय

1. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी जमातीची नातेसंबंध पद्धती
2. गोंड-माडिया जमातीची सगा व्यवस्था (गडचिरोली जिल्हा)
3. गोंड-माडिया जमातीची विवाह परंपरा (भामरागड व एटापल्ली तालुका)
4. गोटूल व्यवस्था (भामरागड व एटापल्ली तालुका)

कोण अर्ज करू शकतात?

1. गोंडवाना विद्यापीठ अंतर्गत पदव्युत्तर (PG) परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी अर्ज करू शकतात.
2. गोंडी, माडिया तसेच इतर आदिवासी भाषांमध्ये संवाद साधता येणाऱ्या स्थानिक विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.
3. सदर संशोधन प्रकल्प हा एम.फिल./पीएच.डी. संशोधनाचा भाग किंवा इतर कोणत्याही संशोधन प्रकल्पाचा भाग नसावा.

फेलोशिप

संशोधनार्थींना दरमहा रु. १०,०००/- संशोधन फेलोशिप देण्यात येईल. आदिवासी अध्यासन केंद्र, गोंडवाना विद्यापीठामार्फत लघु संशोधन प्रकल्पांचा कालावधी १२ महिने असेल.

१० महिने - क्षेत्रीय संशोधन / क्षेत्रभेटी

२ महिने - संशोधन अहवाल लेखन

अर्ज करण्याची अंतिम तारीख :१४ नोव्हेंबर २०२६

tribalstudiescenter@unigug.ac.in
Contact: 9923359126

अधिक माहितीसाठी : डॉ. वैभव मसराम, समन्वयक (आदिवासी अध्यासन केंद्र, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली)